**बृहन्मुंबई महानगरपालिका**

**परिपत्रक**

विषय: गोपाळकाला (दहीहंडी) निमित्त गुरूवार दिनांक ७ सप्टेंबर २०२३ आणि अनंत चतुर्दशी निमित्त गुरूवार दिनांक २८ सप्टेंबर २०२३ रोजी स्थानिक सुट्टी जाहीर करणेबाबत.

संदर्भ: १)महाराष्ट्र शासनाचे क्र.सार्वसु-११२२/प्र.क्र.११७/२९ अन्वयेचे दि.१२.१२.२०२२ रोजीचे परिपत्रक.
२)परिपत्रक क्र.प्रकाअ/५१७ दि.०८.०९.२०२२.

महाराष्ट्र शासनाने संदर्भित परिपत्रकान्वये मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्हयातील शासकीय / निमशासकीय कार्यालयांसाठी गोपाळकाला (दहीहंडी) निमित्त गुरूवार दिनांक ७ सप्टेंबर २०२३ आणि अनंत चतुर्दशी निमित्त गुरूवार दिनांक २८ सप्टेंबर २०२३ रोजी स्थानिक सुट्टी जाहिर केली आहे.

शासनाच्या उपरोक्त परिपत्रकाच्या अनुषंगाने, गोपाळकाला (दहीहंडी) निमित्त गुरूवार दिनांक ७ सप्टेंबर २०२३ आणि अनंत चतुर्दशी निमित्त गुरूवार दिनांक २८ सप्टेंबर २०२३ रोजी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या ठाणे जिल्हयातील महानगरपालिका कार्यालयांसह, मुंबईतील बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या कार्यालयातील कामगार/कर्मचा-यांना (सफाई,रुग्णालये, दवाखाने, प्रसुतीगृहे,जलकामे, विद्युत धुलाई केंद्र, अग्निशमन, उदंचन केंद्र, सुरक्षा, देवनार पशुवधगृह,आपत्कालीन व्यवरथापन हया अत्यावश्यक सेवा वगळून) स्थानिक सुट्टी राहील.

तसेच प्रमुख कामगार अधिकारी यांच्या परिपत्रक क्र.प्रकाअ/५१७ दि.०८.०९.२०२२ नुसार ज्या खाते / विभागातील कामगारांना प्रचलित पध्दतीनुसार १६ सार्वजनिक सुट्टया मिळतात अशा खात्यातील कामगार / कर्मचा-यांना ( परिवहन खाते - शहर, पूर्व, पश्चिम उपनगरे आणि परिवहन पापुमनि खात्यामधील कामगार/कर्मचारी वगळता) उपरोक्त नमूद स्थानिक सुट्टी राहील.

सदर परिपत्रक महानगरपालिकेच्या http://portal.mcgm.gov.in आणि ftp://hr.mcgm.gov.in /Circular /GAD/ChPO /MOP/2023 या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात येत आहे.

| सही/- | सही/- | सही/- | सही/- |
|---|---|---|---|
| दि.०४.०१.२०२३ | दि.०५.०१.२०२३ | दि.१३.०१.२०२३ | दि.२७.०१.२०२३ |
| प्रमुख कर्मचारी अधिकारी (प्रभारी) | सह आयुक्त(सा.प्र.) | अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त(शहर) | महानगरपालिका आयुक्त |

महानगरपालिका आयुक्तांचे कार्यालय,
क्रमांक:प्रकअ/१५१ /सर्वसा/(एमओपी/३०८२)
दिनांक: ०२.०२.२०२३

प्रत-----------------------------------------------------यांना (जादा----------- प्रतीसह) माहितीकरिता व पुढील आवश्यक त्या कार्यवाहीकरिता कृपया अग्रेषित.

प्रशासकीय अधिकारी (आयुक्त)
महानगरपालिका आयुक्तांचे कार्यालय